तरुण भारत ▪गुरुवार १३ फेब्रुवारी २०२०

# सकारात्मक विचारांची कास धरा!

## उषा परब यांचे प्रतिपादन : दोडामार्ग महाविद्यालयाचे पारितोषिक वितरण

वार्ताहर
दोडामार्ग

जीवनात मोठे होण्याचे स्वप्न प्रत्येकजण पाहत असतो. त्यासाठी अगोदर आपले ध्येय निश्चित करण्याची गरज असते. ध्येय गाठण्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती बरोबरच परिश्रम सातत्य आणि चांगल्या मित्रांचा सहवास हवा असतो. आपण व्यासंगी बनून जीवनाकडे सकारात्मकदृष्टीने पाहिले पाहिजे. यशस्वी होण्यासाठी सकारात्मक विचारांची आवश्यकता आहे, असे विचार ज्येष्ठ कवयित्री उषा परब यांनी व्यक्त केले.

दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण सभारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष अभिजीत हेगशेटये होते. यावेळी व्यासपीठावर विकास समितीचे सदस्य बाबुराव वाघमोडे, राजेंद्र केरकर, जि. प. सदस्या संपदा देसाई, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. यू. दरेकर, संस्कृती विभाग प्रमुख डॉ. पी. डी. गाथाडे, स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष प्रा. सोपान जाधव, सांस्कृतिक विद्यार्थी प्रतिनिधी अपेक्षा तीळवे उपस्थित होते.

सर्व मान्यवरांचे स्वागत प्रा. दरेकर यांनी केले. कवयित्री उषा परब यांचाही सत्कार करण्यात आला. वार्षिक अहवाल वाचन प्रा. एस एन जाधव यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे यांनी केले. वार्षिक पारितोषिक वितरणाचे प्रा. डॉ. खडपकर व प्रा. पी. एन. ढेपे यांनी तर आभार प्रा. श्रीवाद पाडगावकर यांनी मानले.



दोडामार्ग : विविध स्पर्धामध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना गौरविताना ज्येष्ठ कवयित्री उषा परब. सोबत अभिजीत हेगशेटये व अन्य. समीर ठाकुर

Scanned by CamScanner